**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ**
**उप मुख्य अधिकारी (धापुप्र/गिरणी) यांचे कार्यालय,**
कक्ष .क्र.२०४/२०५ पहिला मजला, गृहनिर्माण भवन (म्हाडा), कलानगर, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०००५१

जा.क्र. उपमुअ(धापुप्र/गिरणी)/मुं.मं./ /२०२१
दिनांक :- / /२०२१.

# जाहिर सुचना

## मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ गिरणीकामगार विभागातील पात्र लाभार्थ्यांना विक्री किंमत भरण्याकरीता मुदतवाढ देणेबाबत.

---

कोरोना महामारीच्या पार्श्वभुमीवर राष्ट्रीय स्तरावर व राज्यस्तरावर विविध उपाययोजना राबविण्यास सुरुवात केली आहे. त्याअनुषंगाने मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांचे मान्यतेने मुंबई मंडळ गिरणी कामगार विभागातील पात्र लाभार्थ्यांना दिनांक १५/१२/२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु कोरोना महामारीमुळे बहुतांश लाभार्थ्यांनी अर्थिक अडचणीमुळे मुतदवाढीची मागणी केली होती. त्या विचारात घेऊन मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांच्या मान्यतेने गिरणी कामगार सोडतीतील यशस्वी व पात्र लाभार्थ्यांना सदनिकेच्या विक्री किंमतीचा भरणा करण्याकरीता खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

त्यामुळे मुंबई मंडळा अंतर्गत गिरणी कामगारांच्या सदनिकेच्या सोडतीमधील पात्र लाभार्थ्यांना विक्री किंमत भरण्याकरीता दिनांक २८/०२/२०२१ पर्यंत म्हाडाच्या प्रचलित प्रलंबित व्याजासह वाढीव मुदतवाढ देण्यात येत आहे.

**(मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांचे मान्यतेने)**

डॉ. योगेश म्हसे
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई.